दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०११/२०१९
दि.१६/०२/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.शौकत अली शेख, ................अपिलार्थी
२०१, आकाश क्लासिक-१ को.ऑ.हौ.सो.,
क्वीन्स पार्क, मिरारोड (पूर्व),
जि.ठाणे ४०११०७.

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

## -: विवेचन :-

श्री.शौकत अली शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.०५/१२/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

a) Please provide the information about the regular submission of annual declarationof the assets of himself and of his dependents Mr.Narendra Chauhan.

b) Provide the date when annual declaration of assets to MBMC was submitted by Mr.Narendra Chauhan.

c) Information about the number of times he has submitted his asset's declaration during his entire service period in MBMC.

d) Provide the copies of all complaints against Narendra Chauhan.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत कोणतीही माहिती देण्यात आली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०२/०२/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१५/०२/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/०१४/२०१९ दि.१२/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु सदर दिवशी स्थायी समिती सभा आयोजित केली असल्याने सुनावणी रद्द करण्यात आली असुन प्रथम अपिलाची सुनावणी, मा.प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेसमोर दि.१६/०२/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली असुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक

(आस्थापना) यांना जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/१७/२०१९ दि.१४/०२/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती बरोबर आहे. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

O/C

१) श्री.शौकत अली शेख,
२०१, आकाश क्लासिक-१ को.ऑ.हौ.सो., स्पीड पोस्ट
क्वीन्स पार्क, मिरारोड (पूर्व),
जि.ठाणे ४०११०७.

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

20/02/19